**RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY**

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994.)"

**Office of the Controller of Examinations**
**(Revaluation Section)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**

No. RTMNU/Revaluation./2016/313 Dated : 09/11/2016

# पुनर्मुल्यांकनासंदर्भात परिपत्रक

**विषय: अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार सरळ पुनर्मुल्यांकनाकरिता आवेदन करण्याबाबतची कार्यपध्दती**

पुनर्मुल्यांकनासंबंधी अध्यादेश क्रमांक ९/२०१४ अस्तित्वात आला असून सदर अध्यादेशाव्दारे पुनर्मुल्यांकनाची प्रक्रिया अधिक प्रभावी आणि तत्परतेने निकाल जाहिर होण्याच्या दृष्टिकोणातून पुर्नमुल्यांकनाची नविन अतिरिक्त सुविधा लागु करण्यात आलेली आहे.

सदर अध्यादेशातील तरतूदीनुसार सर्व संबधितांनी खालीलप्रमागे कार्यवाही घ्यावी '

**अ) विद्यार्थ्यांनी करावयाची कार्यवाही:**

१) विद्यार्थ्यांनी सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार म्हणजे निर्देश कमांक १५ आणि १६/२०१५ मधील तरतूदीनुसार किंवा अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार पुनर्मुल्यांकनाकरिता आवेदन करण्यास पात्र राहतील. दोन्ही मधून कोणताही एक विकल्प विद्यार्थी निवडू शकतात.

२) पुनर्मुल्यांकनाकरिता अध्यादेश क्रमांक ९/२०१४ किंवा निर्देश क्रमांक १५ आणि १६/२०१६ मधून एकच पर्याय अनुज्ञेय राहील. अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार प्राप्त आवेदन सादर केल्यानंतर निर्देश क्रमांक १६/२०१५ मधील तरतूदीनुसार उत्तरपत्रिकेची छायांकिंत प्रत (Xerox) संबधित विद्यार्थ्यांना प्राप्त होणार नाही.

३) अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार जास्तीत जास्त दोन उत्तरपत्रिकेच्या (झेराक्स प्रती प्राप्त न करता) पुनर्मुल्यांकनाकरिता संबधित महाविद्यालयामार्फत अर्ज करता येईल.

४) अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार उत्तरपत्रिकेची छायांकिंत प्रत (झेराक्स) मिळणार नाही.

५) मुळ निकाल जाहिर झाल्यानंतर ७ दिवसाच्या आंत निर्धारित करण्यात आलेल्या प्रपत्रात गुणपत्रिकेची छायांकित प्रत (झेराक्स) संलग्न करून महाविद्यालयात आवेदन सादर करावयाचे